**रे.दि.मु.नं. ८२/२०१४**

## आदेश

मी प्रतिवादी क्र. १अ ते १ड यांच्याकरीता विद्वान अधिवक्ता श्री. के.ए.सुर्यवंशी यांना ऐकले. वादी करीता विद्वान अधिवक्ता श्री. एस.बी. सुहासे यांनी दिनांक ०७/०८/२०२३ रोजी सदर अर्जाची प्रत प्राप्त केली. परंतु, त्यास म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे, मी आदेश दिनांक ०४/०९/२०२३ प्रमाणे त्यांच्या म्हणण्याशिवाय अर्ज पुढे चालविला.

२. मी अभिलेखाचे काळजीपुर्वक अवलोकन केले. वादीने सदर दावा हक्कज्ञापनासाठी आणि निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये संपरिक्षा सुरु झालेली आहे. त्याप्रमाणे वादीने साक्षीदारांची साक्ष नोंदविली आणि पुढील साक्ष बंद केली. त्यानंतर आदेश दिनांक १५/०६/२०२३ प्रमाणे प्रतिवादींचा साक्षीपुरावा सुध्दा बंद केलेला आहे. प्रकरण युक्तिवादाला नेमलेले असताना प्रतिवादी क्र. १अ ते १ड यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. सबब, त्यांना दाव्याच्या संपरिक्षेबाबत ज्ञान होते. परंतु, त्यांनी सदरची दुरुस्ती यापुर्वी का केलेली नाही याबाबत सविस्तर कारण दिलेले नाही. त्यावरुन त्यांनी दावा लांबविल्याचे निष्पन्न होते. परंतु, सदरचे कारण हे नमूद दुरुस्ती नाकारण्यासाठी पुरेसे व सबळ नाही. याउलट, त्याबाबत खर्च लावणे योग्य होईल. त्या आधारे वादीला अप्रत्यक्षरित्या न्याय मिळू शकेल.

३. प्रतिवादी क्र. १अ ते १ड यांनी प्रस्तुत दुरुस्तीच्या आधारे सदर दावा हा आवश्यक पक्षकारा अभावी प्रतिपालनीय नाही आणि वादीच्या वर्तणूकीमुळे दाव्यास बाधा येते, याबाबत नव्याने बचाव घेतलेला आहे. सदर बचाव हा मूळ बचावाशी विसंगत, विरोधी किंवा स्वरुप बदलणारा नाही. सदर बचाव हा सुसंगत आहे. त्यामुळे, प्रस्तुत दुरुस्ती ही बचावाची स्वरुप बदलवणारी नाही. दोन्ही पक्षांचे कायदेशीर अधिकार ठरविताना नमूद दुरुस्ती ही मदत करणारी आहे. त्या आधारे दावा हा गुणवत्तेवर निकाली काढण्यास मदत होऊ शकते. सदर दुरुस्ती ही दिवाणी

प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे करता येते. सबब, अर्जामध्ये तथ्य आढळून आले. त्यामुळे अर्ज मंजूर करणे योग्य होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

**१.** सदर अर्ज हा न्यायाच्या दृष्टीने खर्च रुपये १०००/- सह मंजूर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी क्र. १अ ते १ड यांनी सदर खर्चाच्या रकमेतील रुपये ५००/- वादीला द्यावे आणि रुपये ५००/- तालुका विधी सेवा समिती, शिराळा येथे भरावेत.

**३.** प्रतिवादी क्र. १अ ते १ड यांनी सदर आदेशाची पुर्तता विहीत कालावधीत करावी, अन्यथा दिवाणी प्रक्रिया संहितेचा आदेश ३९ नियम ११ प्रमाणे प्रस्तुत आदेश हा रद्द होईल याची नोंद घ्यावी.

**४.** आदेश संगणकावर टंकलिखीत केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2023.10.05 16:17:20 +0530

शिराळा. (श. अ. सुरजुसे)

दिनांक – ०४/१०/२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा